**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**उपसंचालक कार्यालय**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

दूरध्वनी क्र. : ०२२ २७५७८७१४/

ईमेल: konkandd@gmail.com
ddgsdakonkan@rediffmail.com

---

जा.क्र उसंको/ प्रशासन/अधिसंख्य पद-अ.ज./सरळसेवा भरती/गट-क/ १२८ /२०२२ दिनांक : ०२/०२/२०२२

## जाहिरात क्रमांक ०१/२०२२

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बी.सी.सी.२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, मंत्रालय, मुंबई, दि.२१ डिसेंबर, २०१९ अन्वये उपसंचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोकण विभाग, नवी मुंबई या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील अनुसचित जमाती प्रवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेले अनुसचित जमाती प्रवर्गातील खालील नमूद गट क संवर्गातील पद सरळसेवेने भरावयाचे आहे. सदर पदाकरिता विहित केलेली अर्हता धारण केलेल्या तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून संगणकावर टंकलिखित केलेले विहीत नमून्यातील अर्ज अनूसचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून विहित नमुद अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| अ क्र | पदाचे मूळ नाव | एकूण पद संख्या | अराखीव (खुला) | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | वि.जा (अ) | भ.ज (ब) | वि.मा.प्र | भ.ज (क) | भ.ज (ड) | इ.मा.व |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| शैक्षणिक अर्हता- Possess degree in any faculty from Recognised University possess a Government commercial certificate or computer typing certificate with as speed not less than 40 words per Minute in English typing or Marathi typing 30 words per Minute as the case may be. | | | | | | | | | | | |

जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या मुदतीत दिनांक- ०४/०३/२०२२ पर्यंत अर्ज या कार्यालयास सादर करावेत. उपरोक्त पदांबाबत सविस्तर जाहिरात, अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना इत्यादी महाराष्ट्र शासनाच्या , कोशल्य विकास , रोजगार आणि उद्योजकता विभागाचे https://mahaswayam.gov.in व भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे https://gsda.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे.

स्वाक्षरी/-
उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
कोकण विभाग, नवी मुंबई

**महाराष्ट्र शासन**

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**<u>उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई</u>**

<u>उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई</u> अंतर्गत गट क मधील अनुसूचित जमाती विशेष भरती सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची

# जाहिरात

जाहिरात क्र.०१ / २०२२ दि.०२/०२/२०२२

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बी.सी.सी.२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, मंत्रालय, मुंबई, दि.२१ डिसेंबर, २०१९ अन्वये उपसंचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई.अनुसचित जमाती प्रवर्गातील निर्माण करण्यात आलेल्या अधिसंख्य पदामुळे रिक्त झालेल्या अनुसचित जमाती प्रवर्गातील गट क पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. त्यासाठी अनूसचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र व अर्हताधारक उमेदवारांकडून विहित नमुद अर्ज ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

१.अर्ज करण्याची पध्दत -

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत परिक्षेकरिता फक्त ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येईल. |
| २ | पात्र उमेदवारांनी **<u>उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई</u>** तथा विभागस्तरीय निवड समिती, यांचे नावे विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक राहिल. |
| ३ | सर्व पदांकरिता ऑफलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ते दिनांक-०४/०३/२०२२ पर्यंत सायं. ४.०० वाजेपर्यंत राहिल. तदनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही. |

२.परिक्षा शुल्क - अनुसचित जमातीच्या उमेदवारांनी रु.१५०/- परिक्षा शुल्क हे उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई यांचे नावाने असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (DD) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक.

३.अनुसूचित जमाती विशेष सरळसेवा भरती २०२२ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रवर्ग | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | अ.ज. | ०१ |

टिप – १.वरील पदासाठी अनुसचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करावा, ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, असे उमेदवारांनी अर्ज सादर करु नये.

२.निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणी करण्यात येईल.

४.वरील कोष्टकात नमूद पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशील खलीलप्रमाणे

| अ.क्र. | पदांचे नाव | वेतनस्तर | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | एस-६-१९९०० ते ६३२०० | Possess degree in any faculty from Recognised University possess a Government commercial certificate or computer typing certificate with a s peed not less than ४० words per Minitue in English typing or Marathi typing ३० words per Minitue as the case may be |

५.वरील पदासाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधिल तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहित उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहिल.<br>प्रतिज्ञापत्र नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपल्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यास पात्र होईल. |

**६.वयोमर्यादा – वरील सर्व पदांसाठी उमेदवार अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेस १८ वर्षापेक्षा कमी वयाचा व ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.**

**७.उमेदवारांना अर्ज सादर करीत असतांना खालील दस्तऐवजांच्या छायांकित प्रती स्वसांक्षाकीत करुन जोडणे आवश्यक आहे.**

१. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
२. जात प्रमाणपत्र
३. जात वैधता प्रमाणपत्र
४. उमेदवारांचा वयाचा पुरावा
५. अधिवास प्रमाणपत्र
६. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
७. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कौकण विभाग, नवी मुंबई या नावाने देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रु.१५०/- धनाकर्ष (Demand Draft).
८. उमेदवारांनी प्रवेश पत्रासाठी संपूर्ण नाव व पत्ता लिहलेला ०१ लिफाफा व ०२ पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत जोडावे.
९. विहित नमुन्यातील अर्ज फोटो लावून संपूर्ण भरणे आवश्यक राहिल.

*__ऑफलाईन अर्जासोबत उपरोक्त नमूद १ ते ९ दस्ताऐवज सादर न केलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.__

**८.प्राप्त अर्जाची छाननी नंतर ज्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरतील असे उमेदवार पुढील टप्प्यासाठी पात्र ठरतील व त्यांची लेखी परिक्षा घेण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. लेखी परिक्षेची वेळ व ठिकाण नंतर कळविणेत येईल.**

* लेखी परिक्षाकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. ज्या उमेदवारांना प्रवेशपत्र मिळाले नाही त्यांना प्रवेशपत्र परिक्षेच्या आदल्या दिवशी   येथे कार्यालयीन वेळेत देण्यात येईल. सदर प्रवेशपत्र निवड प्रक्रीयेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांना दाखवणे अनिवार्य राहिल.

**९.वरील पदासाठी पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात येईल, लेखी परिक्षेचा तपशील खालीलप्रमाणे आहे-**

| अ.क्र. | पदांचे नाव | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बौध्दिक चाचणी | एकूण गुण | एकूण प्रश्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | ५० | ५० | ५० | ५० | २०० | १०० |

**१०.लेखी परिक्षेचा दर्जा / स्तर**

१. लेखी परिक्षेतील प्रश्नांचा स्तर हा सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा निम्न असणार नाही.

२. या पदाकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे, या पदाकरिता परिक्षेचा अर्ज भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहिल. परंतू त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान राहिल.

३. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

**११.परिक्षेस प्रवेश –**

१. लेखी परिक्षेकरिता प्रवेशपत्र प्राप्त करणे व कागदपत्र पडताळणीसाठी व भरती प्रक्रीयेच्या पुढील टप्प्यासाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवाराला स्वत: करावा लागेल.

२. लेखी परिक्षेची वेळ व ठिकाण नंतर कळविणेत येईल.

३. प्रवेशपत्र प्राप्त करण्याच्या वेळी व परिक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी एक सध्याचे वैध फोटो असलेले ओळखपत्र पुरावा म्हणून सोबत ठेवणे अनिवार्य आहे.

**(पॅनकार्ड /पासपोर्ट /वाहन अनुज्ञप्ती /मतदार ओळखपत्र /आधार कार्ड)**

४.लेखी परिक्षाच्या वेळी फक्त पेन, परिक्षा प्रवेशपत्र, ओळखीचा पुरावा सोबत आणावा.

५.डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्लू टुथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रॉनीक्स उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास, स्वत: जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल.

६.परिक्षा दालनात परिक्षेच्या वेळेपुर्वी ३० मिनीटे अगोदर हजर राहणे बंधनकारक राहिल. परिक्षावेळी इकडे तिकडे बघणे, डोकावणे, तोतयागिरी करतांना आढळल्यास उमेदवारास परिक्षा केंद्राबाहेर पाठविण्यात येईल.

७.निवडणुक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य कारणामुळे विहित दिवशी परिक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परिक्षा घेण्यात येईल.

**१२.लेखी परिक्षेनंतर निवडीची कार्यपध्दती —** उपरोक्त पदांकरिता घेण्यात आलेल्या २०० गुणांच्या लेखी परिक्षेमध्ये किमान ४५ टक्के गुण प्राप्त उमेदवारांची गुणांचे आधारे अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

**१३.महत्वाच्या सूचना-**

१.उमेदवारांना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल. लिपाफ्यावर पदाचे नाव ठळक अक्षरात नमूद करावे. प्रत्येक अर्जासोबत रु.१५०/- चा डी.डी.जोडणे बंधनकारक राहिल.

२.उमेदवाराने भरणा केलेले परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये परत केले जाणार नाही.

३.उमेदवारांची निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केले ल्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षा, विभागीय परिक्षा आणि इतर परिक्षा व प्रशिक्षण विहित संधीत कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणने इत्यादी कारवाई केली जाईल.

४.निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती / अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे / उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थिती दर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हांही निदर्शनास आल्यास केलेली निवड / नेमणूक रद्द करण्यात येईल.

५.शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दि.३०.१०.२००५ नुसार दि.१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहिल. त्यांना सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम लागु होणार नाही)

६.ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार मार्गदर्शक केंद्राकडे, सेवायोजना कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नावे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या आफलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल.

७.उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहिल. अर्जाची छाननी केल्यानंतर कोणतेही प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.

८.परिक्षेसाठी सर्व पात्र / अपात्र उमेदवारांची यादी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९.पदभरती संदर्भात वाद / तक्रारीबाबत उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई यांना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकारी राहतील. तसेच न्यायालयीन वाद उदभवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहिल.

१०. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदाच्या संख्येत बदल अथवा भरती रदद झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणाताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित वा रदद करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहे. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

११.या जाहिरातीत नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड ही न्यायालयीन निर्णय, शासनाच्या विविध विभागाच्या शासन निर्ण्य व परिपत्रके यातील निर्देशांच्या अधिन असेल.

१२.भरती प्रक्रीयेसंबंधी सुधारित व अद्ययावत सूचना https://mahaswayam.gov.in व https://gsda.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी स्वत:हून वेळोवेळी प्राप्त करुन घ्यावी.

१३.सदर पदांचा परिविक्षा कालावधी एक वर्षाचा राहिल.

१४.अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांनीच अर्ज करावा.

१५.शासन सेवेत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परवानगीने अर्ज करावा.

ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा पत्ता –
उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग
रुम. नं.७०९, ७ वा मजला, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

दि.०३/०२/२०२२

ठिकाण- नवी मुंबई

**उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, कोंकण विभाग, नवी मुंबई**

**अंतर्गत गट क अनुसूचित जमाती विशेष भरती मोहिम सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात सन २०२२.**

**अर्जाचा विहित नमूना**

अर्जाचा कार्यालयीन क्रमांक ... ... ... ... ...

प्राप्त दिनांक - / /२०२२

प्रति,
मा. उपसंचालक
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
कोंकण विभाग, नवी मुंबई

विषय :- विशेष भरती मोहिमेअंतर्गत अनुसूचित जमाती या प्रवगातील राखीव असलेल्या कनिष्ठ लिपिक पदाकरीता अर्ज.

मा.महोदय,

उपसंचालक संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली विस्तृत जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असून जाहिरातीच्या अनुषंगाने माझ्या जातीचा प्रवर्ग हा अनुसूचित जमाती असून मी ------------------------------------------------------------ , कनिष्ठ लिपिक या पदासाठी अर्ज करीत आहे. सदर पदाकरीता आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे असून मी सदर अर्जासह विस्तृत जाहिरातीनुसार अनिवार्य दस्ताऐवजाच्या स्वसांक्षाकीत छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत.

| आवेदन शुल्काबाबतचे विवरण (ना--- परतावा रक्कम) | | | | |
|---|---|---|---|---|
| धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट) क्रमांक | दिनांक | रक्कम | बँकेचे नांव | शाखेचे नाव |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपुर्ण नाव | आडनांव | नांव | वडीलांचे / पतीचे नांव |
| | मराठी | | | |
| | इंग्रजी (In Capital Letter) | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | | | |
| ३ | कायमचा पत्ता | | | |
| ४ | ई-मेल | | | |
| ५ | जात | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | जातीचा प्रवर्ग योग्य त्या (✓) ठिकाणी करावे. | | | | | | | | |
| | अ.जा. SC | अ.ज. ST | वि.जा.अ. VJ (A) | भ.ज.ब. NT (B) | भ.ज.क NT (C) | भ.ज.ड NT (D) | विमाप्र SBC | इ.मा.व OBC | खुला OPEN |
| ७ | अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक - | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | जन्म तारिख | D | D | M | M | Y | Y | Y | Y | - |
| | अंकात | | | | | | | | | - |
| | अक्षरात | | | | | | | | | |
| | दि. रोजी वय | वर्ष | | महिने | | | दिवस | | | |
| ९ | राष्ट्रीयत्व | | स्त्री/पुरुष | | विवाहित/अविवाहित | | | | | |
| १० | अर्जदार अपंग आहे काय ? होय/ नाही | | | असल्यास, अपंगत्वाचा प्रकार कोणता ? (अंध/अल्पदृष्टी/अस्थीव्यंग/कर्णबधीर) | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | | | | | |
| | उत्तीर्ण परीक्षा | शैक्षणिक संस्था/मंडळ/ विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | मुख्यविषय | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| १२ | तांत्रिक अर्हता असल्यास (Technical Qualification) | | | |
|---|---|---|---|---|
| | उत्तीर्ण परीक्षा | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| १३ | संगणक अर्हता असल्यास (Computer Literacy) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उत्तीर्ण परीक्षा | उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष | गुणांची टक्केवारी | | श्रेणी |
| | MS-CIT | | | | |
| | इतर संगणक अर्हता | | | | |

| १४ | प्रशासकीय अनुभव असल्यास (Administrative Experience ) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्थेचे नांव | धारण केलेले पद | वेतन | सेवेचा कालावधी | | अनुभव | | |
| | | | | पासून | पर्यंत | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | | | | | |

| १५ | सांक्षाकित जोडलेले सहपत्रे (Enclosures) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अ.क्र. | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक | अ.क्र. | सहपत्राचे नांव | सहपत्र क्रमांक |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

# प्रतिज्ञापत्र

मी प्रमाणित करतो की, ह्या अर्जात दिलेली माहीती खरी असून त्या पृष्ठ्यर्थ मी कागदपत्र तपासणीवेळी मूळ प्रमाणपत्राच्या प्रती सादर करीन. मी आणखी असेही प्रमाणित करतो की, वर दिलेली माहीती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझ्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच या माहीतीच्या आधारे होणारी शिफारस/ नियुक्ती रद्दबदल होईल याची जाणीव आहे. त्यासंबंधीचा नियुक्ती प्राधिका-याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक असून माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण -  अर्जदाराची स्वाक्षरी-

दिनांक -  अर्जदाराचे नाव -

**माझ्या नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमूना अ**

**प्रतिज्ञापत्र**

**नमूना - अ (नियम ४ पहा)**

मी-----------------------------------------------------------------------------------------, श्री. ----------------------------------------------------------यांचा मुलगा/ मुलगी वय ----- वर्ष राहणार ------------------------------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की, मी अनुसूचित जमाती प्रवर्गात कनिष्ठ  लिपिक या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे. आज रोजी मला ----- इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --- आहे. हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामूळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-　　　　　　　　　　　　　　　　अर्जदार स्वक्षारी

दिनांक :-　　　　　　　　　　　　　　　　अर्जदाराचे नांव :-